**अतारांकित प्रश्नोत्तरांची दुसरी यादी**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(१) ८३ (१०-०२-२०२०). श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांचे सेवानिवृत्तीचा प्रस्ताव सादर करताना सेवा केलेल्या सर्व शाळेतून सेवा प्रमाणपत्र घेणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व शाळेतील प्रमाणपत्र घेण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यास आर्थिक व मानसिक त्रास होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असून कर्मचा-यांच्या नेमणूकीपासून सेवानिवृत्तीपर्यंतच्या सर्व नोंदी सेवापुस्तकात असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्तीच्या शेवटच्या शाळेतील सेवा प्रमाणपत्राच्या आधारे सेवानिवृत्तीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सेवापुस्तकात केवळ सेवा विषयक प्रशासकीय नोंदी केल्या जातात. त्यामुळे सेवानिवृत्तीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी सेवाकाळात सर्व शाळांमधील ना देय प्रमाणपत्र आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील ग्रामीण भागातील विकास कामांबाबत

**(२) ३९० (२३-०२-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ग्रामीण भागातील विकास कामांपैकी सन २०१९-२०२० मधील मंजूर कामांपैकी ज्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत अशी सर्व कामे पुढील आदेश मिळेपर्यंत स्थगित करण्यात यावीत अशा सूचना ग्रामविकास विभागाने दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत रुपये ४३५०.०० लक्ष रकमेची विकासकामे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी रुपये ३५४४.०० लक्ष रकमेची विकासकामे कार्यारंभ आदेश न झाल्यामुळे स्थगित करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकास कामांमध्ये रस्ते, गटारे, स्मशानभूमी सुधारणा, संरक्षण भिंत व सामाजिक सभागृह इत्यादी सारख्या मुलभूत सोई-सुविधाविषयक कामांचा अंतर्भाव आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेसाठी तरतूद केलेला निम्म्याहून जास्त निधी अखर्चित असून सदर कामांसाठी उपरोक्त योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा माहे मार्च, २०२० पर्यंत विनियोग करावयाचा असल्याने प्रलंबित कामांबाबत कार्यारंभ आदेश देऊन कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने उचित निर्णय घेतला आहे काय तसेच घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२५-०२-२०२०) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सन २०१९-२०२० मधील कामांच्या स्थगितीच्या निर्णयाबाबत शासनस्तरावर सांगोपांग विचार करुन उचित निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत कला, क्रीडा व कार्यानुभव शाळांवरील शिक्षकांना न्याय देण्याबाबत

**(३) ४७६ (१५-०२-२०२०). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इयत्ता ६ वी व ८ वी पर्यंतच्या १०० पेक्षा जास्त पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत कला, क्रीडा व कार्यानुभव शाळांवरील अतिथी निर्देशकाची सन २०१५-२०१६ मध्ये नियुक्ती करण्यात आल्याने राज्यातील १८ हजार शिक्षकांवर उपासमारीची वेळ आल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिक्षकांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१८-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

## राज्यातील शालेय विद्यार्थीनींच्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत

**(४) ७२७ (१५-०२-२०२०). श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.रामदास कदम, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी दिनांक ३ जानेवारी, १९९२ रोजीपासून सुरु करण्यात आलेल्या उपस्थिती भत्ता योजनेनुसार पहिली ते चौथी मधील जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषदांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळेतील आदिवासी क्षेत्राव्यतिरिक्त राज्याच्या अन्य भागातील अनुसूचित जाती-जमाती, भटक्या जमाती आणि विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थीनींना शाळेतील उपस्थितीच्या प्रत्येक दिवसासाठी मागील २८ वर्षापासून केवळ १ रुपया एवढा उपस्थिती भत्ता शासनामार्फत दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी २८ वर्षाचा कालावधी होऊनही सदरहू उपस्थिती भत्त्याच्या रक्कमेत वाढ न झाल्यामुळे या रक्कमेत वाढ करण्यात यावी यासाठी विद्यार्थीनींच्या पालकांनी शासनाकडे अनेकदा मागणी करुनही उपस्थिती भत्त्याच्या रक्कमेत वाढ करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक शिक्षण विभागाने सदर उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत प्रशासनास पत्रव्यवहार केला असून ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण वाढवुन त्यांना आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्याकरिता इतर कोणत्या योजना राबविण्याचे शासनातर्फे विचाराधीन आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढती महागाई लक्षात घेता तसेच दुर्गम भागातील मागास विद्यार्थीनींची शासकीय शाळांमध्ये संख्या वाढविण्याच्यादृष्टीने जिल्हा परिषद महानगरपालिका,

नगरपरिषदांच्या शाळेत शिकणाऱ्या गरिब विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) उपस्थिती भत्ता या योजनेनंतर केंद्र/राज्य पुरस्कृत मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना व मोफत गणवेष योजना सुरू करण्यात आल्या. तसेच मानव विकास मिशनमार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना राबविण्यात आली. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे. त्यामुळे उपस्थिती भत्ता ही योजना आता कालबाहय झाली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता "उपस्थिती भत्ता योजने"चे रूपांतर "मुलींकरीता शौचालयाची देखभाल" या नवीन योजनेत करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अतिथी निदेशक व कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याबाबत

**(५) ९६८ (१५-०२-२०२०). श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिथी निदेशक व कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याबाबत शिक्षक भारती आणि विविध संघटनांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०४-०३-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) सद्य:स्थितीत असा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## राज्यातील शाळा व महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(६) ९७० (३१-०१-२०२०). श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय-निमशासकीय आणि खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१८-०२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) "पवित्र" प्रणालीमार्फत शिक्षकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, दि.०९/०८/२०१९ रोजी ५,८८२ उमेदवारांची पहिली यादी तसेच दिनांक ०७/०२/२०२० रोजी ८३८ उमेदवारांची दुसरी निवड यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. उर्वरित रिक्त जागांसाठीची निवड यादी प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय दि.०७/०३/२०१९ नुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संचमान्यता पूर्ण करण्यात आली असून, अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्याची कार्यवाही संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्यास्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भायखळा (मुंबई) येथील कार्यालयात आरटीआय कार्यकर्त्याला बेदम मारहाण केल्याबाबत

**(७) १०२५ (१५-०२-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील कार्यालयात पोलीस उपायुक्त अविनाश कुमार यांनी आरटीआय कार्यकर्ता यशवंत शिंदे यांना बेदम मारहाण केल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२७-०२-२०२०) :** (१), (२) व (३) दि.२७/१२/२०१९ रोजी श्री.यशवंत शिंदे हे प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी श्री.अभिनाश कुमार यांच्या कार्यालयात गेले असता सुनावणी दरम्यान त्यांना मारहाण झाल्याची त्यांनी तक्रार केली आहे. अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी सखोल चौकशी केली आहे. तथापि, त्यांना मारहाण झाल्याची बाब चौकशीमध्ये दिसून आली नाही.

---

## मराठवाडयातील प्राथमिक आरोग्य केंद्राना नवीन रुग्णवाहिका मिळण्याबाबत

**(८) १११५ (०६-०२-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात मानव विकास कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या जिल्हयात एकुण १३१ प्राथमिक आरोग्य केंद्र असुन या केंद्रांच्या रुग्णवाहिका १० ते १२ वर्षे जुन्या असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर १३१ प्राथमिक आरोग्य केंद्रांना रुग्णवाहिकेसाठी रुपये १३ कोटी १० लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रांना नवीन रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मराठवाड्यातील जालना, परभणी, हिंगोली, नांदेड व बीड या ५ जिल्हयातील ३० तालुक्यामधील ११६ प्राथमिक आरोग्य केंद्रे मानव विकास कार्यक्रमांतर्गत येतात. यातील ११६ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ११२ प्राथमिक आरोग्य केंद्रांची वाहने १० ते १३ वर्षे जुनी आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) जेथे प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील रुग्णवाहिका जुन्या झाल्या आहेत किंवा उपलब्ध नाहीत तेथे डीपीडीसी/मानव विकास निधीतून/मा.खासदार-मा.आमदार निधीतून अनुदान प्राप्त करुन नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करुन घेण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत.

मानव विकास कार्यक्रमांतर्गत निधीतून जिल्हा परिषद नांदेड व परभणी तसेच, मराठवाडा विकास महामंडळांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून जिल्हा परिषद बीड, जालना व हिंगोली येथे रुग्णवाहिका पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विद्युत कंत्राटदार अभियंता, कुशल व अकुशल कामगारांच्या रोजगारीबाबत

**(९) ११८२ (०७-०२-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने स्थापत्य व विद्युत विभागातील कामाची एकत्रित निविदा काढण्याचे परिपत्रक प्रसिध्द करुन विद्युत विभागातील कंत्राटदाराला स्वतंत्र्य निविदा भरता येणार नसल्याचे नमुद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिपत्रकामुळे राज्यात ४० हजार विद्युत कंत्राटदार अभियंता व त्यांच्यावर अवलंबून असलेले कुशल व अकुशल कामगार बेरोजगार होणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थापत्य व विद्युत कामाची एकत्रित निविदा काढण्यामागची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२५-०२-२०२०) :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.०५/०९/२०१९ रोजीच्या आदेशास अनुसरुन रु.३ कोटीवरील किंमतीच्या कामांसाठी स्थापत्य व विद्युत कामांच्या एकत्रित निविदा मागविण्याच्या सूचना शासन निर्णय दि.०५/१२/२०१९ व शुध्दीपत्रक दि.१३/१२/२०१९ नुसार देण्यात आल्या आहेत.
(२) खरे नाही.
(३) स्थापत्य व विद्युत कामे ही एकमेकांशी संलग्न आहेत. विद्युत कामे विहित वेळेत पूर्ण होत नाहीत, परिणामी उपभोक्ता विभागास हस्तांतरणास विलंब टाळावा या दृष्टीने दि.०५/०९/२०१९ च्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अनुसरुन एकत्रित निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शहरातील अनेक भागातील पथदिवे बंद असल्याबाबत

**(१०) ११९४ (०७-०२-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील अनेक भागातील पथदिवे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पथदिवे बंद असल्याबाबत ई.ई.एस.एल. कंपनीकडे तक्रार करुनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२०) :** (१), (२), (३) व (४) अकोला शहरात अंदाजे एकूण २६,००० इतके पारंपारिक पथदिवे असून, केंद्र शासनाच्या धोरणानुसार, यापैकी २२,२९७ इतके एल.ई.डी. पथदिवे बसविण्यासंदर्भात ई.ई.एस.एल. कंपनीबरोबर करार करण्यात आलेला असून, आज अखेर २२,१३४ इतके पथदिवे बसविण्यात आल्याचे कंपनीने महापालिकेस कळविले आहे. त्यानुसार कंपनीने बसविलेल्या दिव्यांची पडताळणी सध्या सुरु आहे.

अकोला शहरात अंदाजे एकूण २६,००० इतके पथदिवे असून, यातील सरासरी १५० ते २०० दिवे बंद असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत असतात.

सदरच्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता, महापालिकेशी संबंधीत दिव्यासंदर्भात महापालिकेकडून व ई.ई.एस.एल. कंपनीच्या दिव्यासंदर्भात संबंधीत कंपनीकडून नियमितपणे कार्यवाही केली जाते.

---

## अकोला-वाशिम मार्गावरील पातूर घाटातील वळण रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(११) १२२१ (१४-०२-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला-वाशिम मार्गावरील पातूर घाटातील वळण रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डयांचे साम्राज्य पसरलेले असून अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०३-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

अकोला-पातुर-मालेगांव-वाशिम-हिंगोली रा.म.क्र.१६१ रस्त्यावरील कि.मी.३४/०० ते ३६/२०० ही लांबी पातुर घाटामध्ये येते. सन २०१९ च्या पावसाळयात तसेच माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर घाट लांबीत पडलेल्या खड्डयांची पावसाळयात तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली व पावसाळा संपल्यानंतर खडी व डांबराव्दारे खड्डे दुरुस्ती दिनांक ०६ डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येऊन घाटातील रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

याशिवाय अकोला ते मेडशी कि.मी.०/०० ते ४७/७०० पर्यंतच्या रस्त्याच्या लांबीमध्ये चौपदरीकरण करण्याकरिता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच चौपदरीकरणाकरिता निविदा मागविण्यात आल्या आहेत असे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, वाशिम यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय-निमशासकीय व खाजगी संस्थांमध्ये महिला तक्रार निवारण समिती असण्याबाबत

**(१२) १२२२ (०६-०२-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय-निमशासकीय व खाजगी संस्थामध्ये शासनाच्या नियमानुसार महिला तक्रार निवारण समिती असणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्हयात शासकीय-निमशासकीय कार्यालये, महाविद्यालय, शाळा, छोटे-मोठे उद्योग यांची संख्या हजारोवर असुनही जिल्हयात फक्त ६३ आस्थापनांमध्ये महिला तक्रार निवारण समिती असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२०-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) औरंगाबाद जिल्हयात ११४ आस्थापनामध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ज्या आस्थापनेवर महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आलेली नाही. त्या कार्यालयामध्ये समिती स्थापन करण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील झीरंग नदीवर पूल बांधण्याबाबत

**(१३) १२९५ (०६-०२-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गडमठ, राऊतवाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) आणि मौजे कासार्डे, साटमवाडी (ता.कणकवली) या दरम्यान वाहणाऱ्या झीरंग नदीवरील पूल बांधण्यात यावा म्हणून त्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी शासनाकडे सन १९८३ मध्ये मागणी केली असता शासनाने सन १९८६-१९८७ मध्ये तेथील ग्रामस्थांची मागणी विचारात घेऊन सदरहू ठिकाणी पुलाऐवजी साकव बांधला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ वर्षापूर्वी बांधलेला साकव कालबाह्य, कमकुवत व धोकादायक झाल्याने पावसाळ्यात या साकवावरून पाणी वाहत असल्याने नदी पलीकडील गावांचा संपर्क तुटतो तसेच एस.टी. बस सेवा बंद झाल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने, साकवा ऐवजी मोठ्या उंचीचा लहान पूल बांधण्यात यावा म्हणून तेथील ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग व उपअभियंता, बांधकाम विभाग, वैभववाडी इत्यादीकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने झीरंग नदीवरील धोकादायक व कालबाह्य झालेल्या साकवा ऐवजी मोठ्या उंचीचा लहान पूल बांधण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२४-०२-२०२०) :** (१) प्रश्नांकित ठिकाणी २० रांगेचा ९०० मी.मी. व्यासाचा ह्युम पाईप कॉजवे बांधलेला आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

ओझरम कासार्डे ब्राम्हणवाडी आचिर्णे गडमठ या इतर जिल्हा मार्ग क्र.१२ च्या सा.क्र.१०/५०० मध्ये उपरोक्त कॉजवे अस्तित्वात आहे. सदर कॉजवेवरुन पावसाळ्यात अतिवृष्टीवेळी पाणी वाहते व वाहतूक खंडीत होते. सदर कॉजवेचा काँक्रीट पृष्ठभाग खराब झाला आहे. कॉजवे दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२०२० अंतर्गत काम मंजूर असून निविदास्तरावर आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कॉजवेच्या ठिकाणी पूल बांधण्याचे काम नाबार्ड टप्पा २५ मधून प्रस्तावित असून पुढील कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने मे.शिव इन्फ्रा व्हिजन प्रा.लि. या विकासकाला इरादा पत्र जारी केल्याबाबत

**(१४) १२९९ (२४-०२-२०२०). श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी प्रादेशिक परिवहन कार्यालय प्रकल्पात (आरटीओ) नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या मे.शिव इन्फ्रा व्हिजन प्रा.लि. विकासकाला इरादा पत्र जारी करताना, करारनाम्याची सत्यता तपासण्यात आली नसल्याचे माहिती अधिकारातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाला इरादा पत्र जारी करताना झोपडपट्टीधारकांच्या करारनाम्याची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक असून याबाबत प्राधिकरणाच्या तहसिलदारांनी कार्यकारी अभियंता, पश्चिम उपनगरे यांना दिनांक ४ डिसेंबर, २०१९ रोजी पत्र पाठवून करारनाम्याची सत्यता तपासण्यात आली नाही, असे पत्र दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे पत्र दिलेले असतानाही बी.आर. मोरे, कार्यकारी अभियंता, आर.एच. पगार, सहाय्यक अभियंता आणि व्ही.सी. तिऱ्हेकर, उपअभियंता यांनी करारनामे उपजिल्हाधिकारी यांनी तपासल्याचा खोटा अहवाल सादर केल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर अहवालाच्या अनुषंगाने दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक ५ डिसेंबर, २०१९ रोजी इरादा पत्र जारी करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुसार संबंधीत दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (०४-०३-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम ३३(१०) (VI) (१.१५) च्या तरतुदी अन्वये विकासकाने ५१% झोपडीधारकांचे वैयक्तिक करारनामे आशयपत्र देण्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विकासक मे.शिव इन्फ्रा व्हिजन प्रा.लि. यांनी एकूण पात्र ५१७ झोपडीधारकांपैकी ३४४ (६६.५३%) झोपडीधारकांचे वैयक्तिक वैध करारनामे आशयपत्र पारित करण्यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास नियमानुसार सादर केलेले आहेत. तसेच अण्णा नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आणि नविन विकासक मे.शिव इन्फ्रा व्हिजन प्रा.लि. यांनी सदर करारनाम्यांच्या सत्यतेबाबत दि.०३/१२/२०१९ रोजीचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. करारनाम्याची संख्या नियमानुसार आहे. तसेच सदर करारनाम्यांच्या सत्यतेबाबत संबंधित झोपडीधारकांच्या संस्थेने नविन विकासकासह नोटरी करुन प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेचा विकास अतिशय संथ गतीने सुरु होता म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासक मे.के.एस.चमणकर यांची नियुक्ती महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु. नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) अन्वये रद्द केली. तद्नंतर कायदेशीर व न्यायालयीन प्रक्रियेअंती विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ अनुसार दि.०८/०३/२०१९ रोजी सुधारित आशयपत्र देण्यासाठी विकासक मे.शिव इन्फ्रा व्हिजन प्रा.लि. यांनी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आशयपत्र पारित करण्यापूर्वी अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.३१/१०/२०१९ रोजी प्रस्तावास तत्वत: मंजुरी दिली आहे. सदर अटी व शर्तीपैकी अट क्र.१ अनुसार विकासकाने ५१% झोपडीधारकांचे वैयक्तिक करारनामे सादर करण्याच्या अटीची पूर्तता दि.०४/१२/२०१९ रोजी केल्याने दि.०५/१२/२०१९ रोजी आशयपत्र जारी करण्यात आले, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रामधील अपुऱ्या सोयी सुविधांबाबत

**(१५) १३२६ (३१-०१-२०२०). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जीर्ण झालेल्या इमारती, डॉक्टरांची रिक्त पदे व अपु-या सोयी सुविधांमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयांमध्ये अपुऱ्या सुविधा व कर्मचाऱ्यांमुळे तेथे काम करणाऱ्यांना जादा वेळ काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जीर्ण झालेल्या इमारतींची दुरुस्ती, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तसेच सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१७-०२-२०२०) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) उपजिल्हा रुग्णालय, शहापूरची इमारत सुस्थितीत आहे. उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची १५ पदे भरण्यात आली आहेत.

ग्रामीण रुग्णालय, खर्डीकरीता नविन इमारत बांधणेसाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. ग्रामीण रुग्णालयास स्वतःची इमारत नसल्यामुळे २५ मंजूर पदांपैकी १५ पदे भरण्यास मंजूरी आहे. त्यापैकी ११ पदे भरलेली आहेत. उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

शहापूर तालुक्यातील ९ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ५ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती जीर्ण झाल्या असून, त्यासाठी डी.पी.डी.सी. मध्ये अनुदानाची मागणी केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्व म्हणजे १८ पदे भरण्यात आली आहेत. ९ प्राथमिक आरोग्य केंद्रातील एकूण १९९ पैकी १८९ पदे भरली असून १० पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरणेची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरुन सुरु आहे. रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना उपलब्ध आरोग्य सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(१६) १३३८ (०४-०२-२०२०). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातून प्रस्तावित विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसाठी संपादित केलेल्या जमीनधारकांना बुलेट ट्रेनसाठी संपादित केलेल्या जमिनींप्रमाणे मोबदला मिळावा अशा आशयाची मागणी करणारे निवेदन सर्वपक्षीय युवा मोर्चाच्या शिष्टमंडळाने श्री संजय खंदारे, अतिरिक्त आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांना दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात बाधित जमिनींच्या मोबदल्याचे दर निश्चित करावेत, कुळांच्या जमिनी नोकऱ्या यासारख्या मागण्या निवेदनात करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्प बाधित शेतक-यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी संपादन करावयाच्या खाजगी जमिनीचा मोबदला भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी संपादनास संमती दर्शविल्यास महसूल व वन विभागाकडील शासन परीपत्रक दिनांक २५/०१/२०१७ प्रमाणे मोबदला जिल्हास्तरीय समितीव्दारा निश्चित करण्यात येणार आहे. निश्चित करण्यात येणारा मोबदला प्राधिकरणाकडून संबंधित जमीनधारकांना देण्यात येईल.

---

## कसारा (जि.ठाणे) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) १३४८ (१०-०२-२०२०). श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६७१४ ला दिनांक २० जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा (जि.ठाणे) ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी शासनाकडून वाढीव पूरक पाणीपुरवठा योजनेसाठी रुपये १४ कोटी मंजूर होऊन सन २०१४ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय स्तरावरून सदर योजनेला मान्यता मिळण्यासाठी स्थानिकांकडून आवश्यक ती लोकवर्गणी जमा करण्यात आली असून कसारा येथील ५ प्रभागात आठ दिवसांनी होणारा पाणीपुरवठा चार दिवसांवर आणण्याची शासनाची योजना असफल झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत असून मागील ४ वर्षापासून प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना सदरहू योजनेचा लाभ मिळण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेचे काम भौतिकदृष्ट्या १००% पूर्ण झाले असून दिनांक १६/०३/२०१९ पासून जलशुध्दीकरण केंद्रातून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. तथापि, अस्तित्वातील वितरण व्यवस्थेवरील नळ जोडण्या ग्रामपंचायतीमार्फत नवीन वितरण व्यवस्थेवर स्थलांतरीत न झाल्याने, नवीन वितरण व्यवस्था कार्यान्वित करता येत नाही. त्यामुळे गावातील अस्तित्वातील वितरण व्यवस्थेद्वारे ग्रामपंचायतीमार्फत ८ दिवसांनी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तथापि, शासनाची पाणीपुरवठा योजना असफल झाली नसल्याने पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यासह टंचाईग्रस्त इतर तालुक्यांना टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१८) १३५२ (१५-०२-२०२०). श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४१३६४ ला दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यात दरवर्षी सर्वाधिक टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असून आता कल्याण ग्रामीण आणि भिवंडी तालुक्यातील वाड्या वस्त्यांनासुध्दा दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुक्यातील ७१ गावे आणि १६४ पाड्यांसाठी सन २०१८-२०१९ मध्ये सर्वाधिक ३४ टँकरने पाणीपुरवठा करताना रुपये १ कोटी पेक्षा अधिक निधी खर्च केल्याने ठाणे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त तालुक्यांच्या तुलनेत मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारा शहापूर तालुका सर्वाधिक टँकरग्रस्त तालुका म्हणून गणला गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शहापूर तालुक्यातील अजनूप, कोळीपाडा, वरचा गायदरा या आदिवासी पाड्यातील विहिरींनी तळ गाठल्याने येथील ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर यांना माहे जानेवारी, २०२० च्या सुरुवातीलाच निवेदन देऊन या गावांना/पाड्यांना टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर तालुक्यासह ठाणे जिल्ह्यातील टंचाईग्रस्त तालुक्यांना टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी प्रतिवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होत असल्याने त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-०३-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

शहापूर व मुरबाड तालुक्यातील काही गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. तथापि, कल्याण व भिवंडी तालुक्यात मागील ६ वर्षामध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागलेला नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१८-२०१९ मध्ये शहापूर तालुक्यात ६४ गावे आणि १६६ पाड्यांसाठी ३४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील अजनुप ग्रामपंचायतींतर्गत कोळीपाडा व वारलीपाडा या पाड्यांमधील विहिरींची पाणी पातळी पूर्णपणे खालावल्याने सदर २ पाड्यांना दिनांक ३१/०१/२०२० पासून १ टँकरचे माध्यमातून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

वरचा गायधरा या पाड्यामध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असून, टँकरची मागणी आलेली नाही.

(४) शहापूर तालुक्यात ठाणे जिल्ह्यातील पाणी टंचाई कायमस्वरूपी दूर करण्यासाठी टंचाई कृती आराखड्याशिवाय राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलयुक्त शिवार कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यात येत आहेत.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील टंचाईग्रस्त ९७ गावांसाठी इगतपूरी येथील भावली धरणाच्या पाण्यावर आधारित नळ पाणीपुरवठा योजनेस मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांच्या अध्यक्षतेखाली गठित उच्चाधिकार समितीने दिनांक ०४/०२/२०२० रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली ते टिटवाळा रिंगरुटच्या कामात बाधित होणाऱ्या नागरिकांना मोबदला मिळण्याबाबत

**(१९) १३५४ (१४-०२-२०२०). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील डोंबिवली ते टिटवाळा रिंगरुटचे काम एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गात बाधित होणाऱ्या नागरिकांना त्यांची घरे वा जमिनीचा मोबदला न मिळाल्याने नागरिकांकडून विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महत्वाकांक्षी मार्ग पूर्ण करण्यासाठी बाधित होणा-या नागरिकांना मोबदला देऊन त्यांचे योग्य ते पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सदर रिंगरूटने बाधित रहिवाश्यांचे पुनर्वसन होण्याबाबत नागरिकांकडून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(३) बाह्यवळण रस्त्याने बाधित होणाऱ्या ८९० बांधकाम धारकांना बांधकामाबाबतचे अधिकृत पुरावे सादर करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २१२ अन्वये नोटीशी देण्यात आलेल्या आहेत.

बांधकामाचे पुरावे प्राप्त झाल्यानंतर पुनर्वसन समिती पुढे ठेवण्यात येतील. तद्नंतर पात्र बांधकाम धारकांना पुनर्वसन/मोबदला देण्याचे धोरण महासभेपुढे सादर करून मा.महासभेच्या मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर रस्त्याने बाधित होणाऱ्या ३८७ जमीन मालकांपैंकी २२ जमीन मालकांना बांधकाम परवानगी दिली आहे, ९६ जमीन मालकांनी TDR साठी इरादापत्र दिले आहे, १०९ जमीन मालकांनी लेखी संमतीपत्र दिले असून, ४० जमीन मालकांनी तोंडी संमतीपत्र दिले आहे. त्यावर पुढील कार्यवाही सुरू आहे. १२० नागरिकांनी अद्याप काहीही प्रतिसाद दिलेला नाही.

सदर प्रकल्पातील बाधितांना प्रचलित नियमानुसार विहित प्रक्रिया अवलंबून मोबदला देण्याची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, डोंबिवली येथील कारखान्यातून होणाऱ्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(२०) १३७२ (१५-०२-२०२०). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, डोंबिवली येथील कारखान्यांमुळे सातत्याने होणाऱ्या प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण नसल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तसेच औद्योगिक सुरक्षा विभाग यांच्यामध्ये ताळमेळ नसल्याने प्रदुषणाची परिस्थिती ओढवल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने सन २०१५ मध्ये स्फोटक स्वरूपाच्या रासायनिक कारखान्यांमुळे निर्माण होणारे धोके लक्षात घेऊन कारखान्यांनी घ्यावयाची खबरदारी, उपाययोजना व उद्भवणाऱ्या अपघातातून सहाय्यता करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आखून दिलेली असताना, त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याने डोंबिवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील औद्योगिक व नागरी सुरक्षा दिवसेंदिवस धोक्यात आल्याचे आरोप पर्यावरणप्रेमी यांनी शासनाकडे करुनही त्याबाबत शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३ वर्षापूर्वी प्रोबेस एंटरप्रायझेस, डोबिवली या कंपनीतील स्फोटाच्या दुर्घटनेत १२ जण ठार तर २०० पेक्षा अधिक जखमी झाले तरीही येथील प्रदूषण नागरी तसेच औद्योगिक सुरक्षा विभाग याबाबत शासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खर आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारखान्यातून होणाऱ्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१३-०३-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कल्याण-डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अतिधोकादायक उद्योगांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/०२/२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.

मे.प्रोबेस एंटरप्रायझेस, डोंबिवली या कंपनीमध्ये दिनांक २६/०५/२०१६ रोजी झालेल्या स्फोटाच्या दुर्घटनेत १२ जण ठार व सुमारे २१५ व्यक्ती जखमी झाल्या होत्या. सदर घटनेची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने नोंदविलेल्या निष्कर्षानूसार सदर अपघातास जबाबदार कारखान्याच्या भोगवटदाराविरुध्द दिनांक २४/०८/२०१६ रोजी चार फौजदारी स्वरुपाचे खटले दाखल करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य व संचालनालय यांनी सुचविलेल्या शिफारशींनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर औषधे उपलब्ध करण्याबाबत

**(२१) १३८४ (०६-०२-२०२०). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब व गरजू रुग्णांच्या औषधोपचारासाठी शासनाने जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरु केली असून या आरोग्य केंद्रामध्ये ४२९ हून अधिक प्रकारच्या गोळ्या व औषधांचा साठा शासनाकडून पुरविला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टिटवाळा नजीक गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे गेल्या अनेक महिन्यांपासून प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधांचा तुटवडा असल्याचे सांगून रुग्णांना ठराविक प्रकारच्याच गोळया व औषधे देऊन परत पाठविले जात असल्याचे दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्यामुळे तेथील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना बाहेरुन स्वखर्चाने औषधे आणावी लागत असल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना औषध पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१८-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

टिटवाळा नजीक गोवेली येथील रुग्णालयात अत्यावश्यक व इतर पूरक औषधे व साहित्यांचा साठा उपलब्ध असून रुग्णांना आवश्यकतेनुसार रुग्णालयातूनच औषधांचा पुरवठा नि:शुल्क करण्यात येतो.
(३) हे खरे नाही.

सदर रुग्णालयातील रुग्णांनी बाहेरुन औषधे खरेदी केल्याबाबतची कोणतीही तक्रार उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांना प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पुरातन मंदिरे व वास्तु यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी स्वतंत्र प्रशासकीय विभाग स्थापन करण्याबाबत

**(२२) १३९७ (०६-०२-२०२०). श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक पुरातन मंदिरे, वास्तु या जुन्या व जीर्ण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची देखभाल दुरुस्ती होत नसल्यामुळे तसेच यापैकी बहुतांश मंदिरे व वास्तु हया ब्रिटीश काळात बांधलेल्या असल्याने त्या नष्ट होण्याची तसेच पावसामुळे वा इतर कारणांमुळे कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुरातन मंदिरे व वास्तु यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासनाने बांधकाम विभागाच्या धर्तीवर एक वेगळा "प्रशासकीय विभाग" स्थापन करावा अशी मागणी करण्यात आली असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२४-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तथापि, राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरूस्तीची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतात.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वृध्दांकरिता आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविण्याबाबत

**(२३) १४४१ (१८-०२-२०२०). अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वर्धा, भंडारा, वाशिम, हिंगोली व जालना या जिल्ह्यांमध्ये वयाचे ६० वर्ष पूर्ण केलेल्या वृध्दांसाठी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुष्यमान भारत योजनेचे स्वरूप व कार्यपध्दती काय आहेत,

(३) तसेच, सदर योजनेच्या माध्यमातून ५ जिल्ह्यांतील किती वयोवृध्दांना त्याचा लाभ मिळणार असून राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये आयुष्यमान भारत योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) केंद्र शासनाकडून करण्यात आलेल्या सामाजिक, आर्थिक व जातीनिहाय सर्वेक्षणानुसार शहरी व ग्रामीण भागासाठीच्या विशिष्ट निकषांनुसार राज्यातील ८३.७२ लक्ष पात्र लाभार्थी कुटुंबासाठी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दिनांक २३/०९/२०१८ पासून राबविण्यात येत आहे. योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अतिरिक्त ३२९ उपचारासह एकूण १३०० उपचारांचा प्रतिवर्ष प्रतीकुटुंब रूपये ५ लक्षपर्यंतचे अंगीकृत रुग्णालयातून मोफत उपचार अनुज्ञेय आहेत.

ही योजना राज्यातील सर्व जिल्ह्यातील व सर्व वयोगटांतील पात्र लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रयोगशाळा पदनिर्मिती प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(२४) १५१९ (१५-०२-२०२०). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या प्रयोगशाळेकरिता पदनिर्मिती व पदांची मंजूरी करण्याबाबतचा माहे जुलै, २०१६ पासूनचा सविस्तर प्रस्ताव नागपूर अन्न व औषध प्रशासनाच्या वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाने वित्त विभागास दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर करूनही प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रयोगशाळेकरीता पदनिर्मिती व पदाची मंजूरी देण्यात आली नसल्याने लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.अन्न व औषध प्रशासन मंत्री यांना दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रयोगशाळा पदनिर्मिती प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०४-०३-२०२०) :** (१) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य या कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ०९/०६/२०१७ अन्वये गठित अमुस (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उपसमितीसमोर छाननी व शिफारशीकरिता सादर करण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे.

यानुषंगाने, समितीच्या बैठकीसाठी आवश्यक असलेली माहिती वित्त विभागाला दिनांक १७/०१/२०२० रोजी उपलब्ध करून दिलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाच्या आकृतिबंधाचा आढावा घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. आकृतिबंधाच्या आढाव्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर, सुधारित पदांच्या आकृतिबंधाच्या प्रस्तावास मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डागा स्मृती शासकीय रूग्णालयात गर्भवती महिलांना योग्य सुविधा उपलब्ध होण्याबाबत

**(२५) १५२१ (१८-०२-२०२०). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील डागा स्मृती शासकीय स्त्री रूग्णालय येथे गर्भवती महिलांची गंभीर आजारासंदर्भातील चाचण्यांची तपासणी करण्याकरीता लागणारे रसायन व किट उपलब्ध नसल्यामुळे गर्भवती महिलांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रूग्णालयात गर्भवती महिलांना योग्य सुविधा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील गुरुनानक शाळेजवळील पोलीस चौकी बंद असल्याबाबत

**(२६) १५३१ (१५-०२-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील शेरेपंजाब कॉलनी परिसरातील गुरुनानक शाळेजवळील शेरेपंजाब पोलीस चौकी कर्मचाऱ्यांअभावी अनेक महिन्यांपासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस चौकी बंद असल्याने सदर परिसरात गुन्हेगारीचे प्रमाणात वाढ होत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०४-०३-२०२०) :** (१) हे खरे नाही.

शेरेपंजाब पौलीस चौकी (बिट क्र.४) चालू आहे. सदर पोलीस चौकीवर १ पोलीस निरीक्षक, ३ पोलीस उपनिरीक्षक व १२ अंमलदार यांची नियुक्ती केलेली आहे. सदर बिट क्र.४ येथील परिसरात मेघवाडी बीट मार्शल-४ देखील कार्यरत असून त्याव्यतिरिक्त मेघवाडी पोलीस ठाणेतील वाहनांवरील अधिकारी/अंमलदार, पर्यवेक्षक अधिकारी, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे व दहशतवाद विरोधी कक्षाचे अधिकारी/अंमलदार देखील गस्त करीत असतात.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यात साथीच्या रोगांची लागण झाल्याबाबत

**(२७) १५६४ (०६-०२-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या आठ महिन्यात स्वाईन फ्ल्यू, कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, काविळ, विषमज्वर, मलेरिया, लेप्टो, डेंग्यू इत्यादी रोगांची लागण झालेले हजारो रुग्ण आढळलेले असून त्यापैकी शेकडो रुग्ण दगावल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, स्वाईन फ्ल्यूचे मुंबईसह राज्यात दोन हजारांहून अधिक रुग्ण आढळले असून त्यापैकी २४४ जणांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वाईन फ्ल्यू व इतर आजारास प्रतिबंध करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच रुग्णांसाठी व आजाराने मृत्यू पावलेल्या रुग्णांच्या कुटुंबियांना मदत देण्यात आली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात जून, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, काविळ, विषमज्वर या जलजन्य आजाराचे राज्यात एकूण २२ उद्रेक झाला असून या उद्रेकामध्ये १०४७ रुग्ण आढळले त्यामध्ये कॉलराने ३ जणांचा मृत्यू झाला. इतर जलजन्य आजारांमुळे कोणाचाही मृत्यू झालेला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) स्वाईन फ्ल्यूसह इतर साथरोगाचा प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना राज्यभर राबविण्यात येत आहे.

- नियमित साथरोग सर्व्हेक्षण.
- किटकजन्य आजारासाठी किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- पाणी गुणवत्ता सनियंत्रण.
- साथरोग निदानासाठी पुरेशा प्रयोगशाळा.
- साथरोग उपचाराची सर्व आरोग्य संस्थामध्ये सोय व पुरेसा औषध पुरवठा.
- स्वाईन फ्ल्यूसाठी अतिजोखमीच्या व्यक्तींना प्रतिबंधात्मक लसीकरण.
- हिवताप संवदेनशील भागात वर्षातून दोन वेळा किटकनाशक फवारणी.
- एकात्मिक किटक व्यवस्थापन.
- साथरोग उद्रेक प्रतिबंध व नियंत्रणासाठी जिल्हा व राज्यस्तरावर शीघ्र प्रतिसादर पथके कार्यरत.
- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

साथरोगाने आजारी पडलेल्या अथवा मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची कोणतीही तरतूद सध्या उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२८) १५७७ (१४-०२-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम जमिनी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार उक्त आंतरराष्ट्रीय विमानतळाचे विस्तारीकरणाचे काम पूर्ण होण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे (०३-०३-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विशेषत: विलेपार्ले (पश्चिम) मुंबई तसेच ठाणे येथील अनेक एसआरए प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(२९) १६०२ (१४-०२-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: प्रेमनगर, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई तसेच ठाणे येथील झोपडपट्टी पुनर्वसनाच्या अनेक योजना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी किती आणि कोणत्या विकासकाचे एसआरए प्रकल्प प्रलंबित आहेत, याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, घेतलेल्या आढावाच्या अनुषंगाने प्रलंबित एसआरए प्रकल्प तात्काळ सुरु करण्याबाबत व सदर कामांना गती देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (०४-०३-०२०२) :** (१), (२) व (३) विलेपार्ले (पश्चिम) येथील प्रेमनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सन २००२ मध्ये मंजुरी दिली आहे. तथापि, सदर योजनेतील झोपडीधारकांच्या कार्यकारणीची निवडणूक, परिशिष्ट-२, योजनेच्या विकासकास ७०% झोपडीधारकांची संमती व विकासकाची आर्थिक व तांत्रिक क्षमता या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल

करण्यात आली. तसेच विकासकाने देखील मा.उच्च न्यायालयात याचिका ४ दाखल केल्याने सदर झोपडपट्टी योजना प्रलंबित आहे.

तसेच योजनेतील झोपडीधारकांचे टप्याटप्याने निष्कासन करावे लागल्याने योजनेचा विलंबकाळ वाढलेला आहे.

झोपडीधारकांकरीता ३०० चौ. फुटांच्या सदनिका बांधण्याकरीता सुधारित आशयपत्र प्राप्त करण्याकरीता विकासकाने जुलै, २०१९ मध्ये त्रुटीयुक्त व अपूर्ण प्रस्ताव सादर केल्याने सुधारित आशयपत्राबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने पुढील कार्यवाही केलेली नाही.

मुंबई येथे झोपडपट्टी पुनर्वसनाच्या एकूण १४८१ व ठाणे येथील एकूण ७१ योजना राबविल्या जात असून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने माहे जानेवारी, २०२० मध्ये घेतलेल्या आढाव्यामध्ये, सक्षम प्राधिकारी यांच्यामार्फत परिशिष्ट-२ वितरीत न करणे, झोपडीधारकांच्या असहकार्यामुळे ३३/३८ अन्वये कारवाई करणे, १३(२) अंतर्गत कारवाई करणे, वित्त पुरवठ्या अभावी, न्यायालयीन प्रकरणे व विविध शासकिय विभागामार्फत अप्राप्त ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादी कारणास्तव एकूण ७८१ योजनांचा विकास प्रलंबित व संथ गतीने सुरु असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्याकरीता, परिशिष्ट-२ निर्गमित करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांची केंद्रीकृत यंत्रणा, Auto DCR, अपिलाची एकस्तर पध्दत इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे विकासक, वास्तुविशारद आणि परवानाधारक सर्वेक्षक अभियंते यांच्याबरोबर दरमहा संयुक्त बैठक घेऊन त्यांच्या समस्यांचे शक्यतोवर जिथल्या तिथे अथवा एक-दोन दिवसांत निराकरण करतात. राष्ट्रीय बँकांकडून वित्त पुरवठा करण्यात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि राष्ट्रीयकृत बँकांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयाने अधिक प्रयत्न सुरु आहेत, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

---

## नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(३०) १६१२ (१४-०२-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४७९८६ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी कमाल जमीन धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द झाल्यानंतर या कायद्याच्या योजनेंतर्गत असलेले सुमारे १७५७२ एकर भूखंड शासनाने ताब्यात घेण्याची कार्यवाही न केल्यामुळे सन २०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदर भूखंड शासनाने ताब्यात घ्यावे असा आदेश दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर शासनाने याबाबत शिफारशी करण्यासाठी स्थापन केलेल्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी.एन.श्रीकृष्ण यांच्या आयोगाने आपला अहवाल शासनास सादर केलेला असून सदर अहवाल शासनाने माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्वीकारला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरी कमाल जमीन धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द झाल्यानंतर त्या अंतर्गत योजनेनुसार किती भूखंड ताब्यात घेणे आवश्यक होते व त्यांची बाजार भावानुसार अंदाजे किंमती किती आहे,

(४) तसेच निवृत्त न्यायमूर्ती बी.एन.श्रीकृष्ण यांच्या आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२०) :** (१), (२), (३) व (४) राज्य शासनाने नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ हा दि.२९/११/२००७ रोजी स्वीकारला असून उक्त अधिनियमानुसार कलम २० अन्वये मंजुर केलेल्या योजना व कलम १०(३)/१०(५) नुसार ताब्यात घेतलेल्या जमिनींना संरक्षण प्राप्त आहे.

परंतु, नाजकधा निरसन अधिनियमानुसार कलम २० च्या वैधतेबाबत महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसींग इंडस्ट्रीज व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर रिट याचिका क्र.९८७२/२०१० दाखल केली होती. उक्त याचिकेमध्ये मा.न्यायालयाने कलम २० खालील योजनेच्या अटी व शर्ती योजनाधारकांवर बंधनकारक असल्याचा दिलेला निर्णय, विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित झाला होता. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१०/११/२०१४ रोजी योजनाधारकांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होईल, अशी कारवाई (Coercive action) करु नये असे आदेश दिले होते. मा.न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर योजनाधारकाकडून योजनेखालील क्षेत्रांचा विकास होत नव्हता.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दि.२/७/२०१९ अन्वये व्दिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेला अहवाल, त्याबाबतची शासनाची भुमिका व Consent Terms मा.सर्वोच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लीकेशनव्दारे दाखल करण्यात आली. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०२/०७/२०१९ रोजी व्दिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यास अनुमती दिल्याने शासन निर्णय, दि.१/८/२०१९ नुसार कलम २० खालील योजनांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार अधिमूल्याचा भरणा करुन योजनेखालील क्षेत्र रहिवास प्रयोजनार्थ विकासास अनुज्ञेय केलेले असून कमी आकारमानाच्या सदनिका ठेवण्याचे बंधन घालून गृहबांधणीस प्रोत्साहन दिलेले आहे. ज्या विकासकांना कलम २० च्या अटी / शर्तीनुसार योजना पुर्ण करावयाची असेल तर सदर विकासकांना त्यानुसार योजना पूर्णत्वास नेणेस प्रत्यवाय नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## रायगड जिल्हयातील रेवस ते सिंधुदुर्ग सागरी महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३१) १६२१ (१४-०२-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६१३२ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड येथील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोंदा ५५० कि.मी. लांबीच्या दुपदरी मार्गासाठी तब्बल २ हजार ५०० कोटींचा (सविस्तर प्रकल्प अहवाल) डीपीआर तयार करुन मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सागरी महामार्ग काही वर्षापासून निधी अभावी प्रलंबित होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सागरी महामार्गाबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन, निधी उपलब्ध करुन, सदर सागरी महामार्ग त्वरीत पुर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (०३-०३-२०२०) :** (१) हे खरे आहे.

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातून जाणाऱ्या ५४० कि.मी. लांबीच्या सागरी महामार्गाचे २/४ पदरीकरण व पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्याकरिता रु.५८९१.२९ कोटी अंदाजपत्रकीय रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन मार्च, २०१८ मध्ये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर सागरी महामार्गाचे महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाने तत्वत: मान्यता प्राप्त राष्ट्रीय महामार्गाचे २/४ पदरीकरण व पेव्हड शोल्डरसह उन्नतीकरण करण्याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी

२०१६-२०१७ मध्ये रु.१५.०० कोटी निधीची तरतूद केली. त्यानुसार सदर कामासाठी ४ भागांमध्ये निविदा निश्चिती करण्यात येऊन कंत्राटदाराकडून सर्वेक्षण करण्यात आले व त्यानुसारचा सविस्तर प्रकल्प अहवाल मार्च, २०१८ मध्ये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. तसेच भूसंपादनाची प्राथमिक प्रक्रिया हाती घेण्यात आली असून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील भूसंपादनाकरिता ३-ए अधिसूचना विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे.

केंद्र शासनाकडून सदर रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर होताच प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील देवनार कब्रस्तानासाठी जागा वाढवून देण्याबाबत

**(३२) १६६० (३१-०१-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (पूर्व) उपनगरातील मानखुर्द, शिवाजी नगर, गोवंडी परिसरातील सुमारे ८ लाख मुस्लीम लोकसंख्येसाठी देवनारचे कब्रस्तान कार्यरत असून वाढत्या लोकसंख्येमुळे सदर कब्रस्तानची जागा वाढवावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली असून देवनार कब्रस्तानचे आरक्षण हटवून निवासी आरक्षण करण्याची मागणी एका विकासकाकडून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवनार कब्रस्तानाचे आरक्षण कायम ठेवून या परिसरातील वाढत्या मुस्लीम समाजाच्या लोकसंख्येमुळे कब्रस्तानाची जागा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२०) :** (१) होय.

न.भू.क्र. १(भाग) मौजे देवनार येथे विद्यमान कब्रस्तान असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये दि. २७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ मध्ये सदर विद्यमान कब्रस्तान लगतचे जमिनीवर "कब्रस्तान" (आरएसए ४.८) चे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, प्रस्तावित आरक्षणासंबंधी प्राप्त हरकती/सूचनांमध्ये समाविष्ट मे.स्टार बिल्डर्स प्रा.लि. यांनी महापालिकेस सादर केलेल्या हरकत पत्रानुसार सदर जागेवर यापूर्वीच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.२५/०२/२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मंजूरी दिल्याचे सुनावणीचे वेळी दिसून आले. त्यानुसार नियोजन समितीने केलेल्या शिफारसीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम ३० अन्वये शासनास सादर करताना सदर प्रस्तावित आरक्षण वगळणेबाबत शिफारस केली. विकास आराखडयास शासनाने दि.८/०५/२०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे मंजूरी देताना सारभूत स्वरुपाचे बदल म्हणून सदर आरक्षण मंजूरीतून वगळलेल्या ईपी-एमई १०० मध्ये आहे. विकास योजना मंजूरीतून वगळलेल्या फेरबदलाबाबत वैधानिक कार्यवाही करण्यात आली असून सदर वगळलेल्या भागाच्या विकास योजनेस कलम ३१ अन्वये शासनाची अंतिम मंजूरी देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) देवनार कब्रस्तानापासून अंदाजे २ कि.मी. वर (ईएसए ४.२) रफी नगर मुस्लीम कब्रस्तान स्थित असून त्याचे अंदाजे क्षेत्रफळ १५,४२० चौ.मी. आहे. तसेच रफी नगर कब्रस्तानाला लागून असलेली जमीन कलम २६ अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजनेत ना-विकास विभागात दर्शविली होती. तथापि, उक्त जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेने कलम ३० अन्वये विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करताना सुमारे १५७३० चौ.मी. क्षेत्रावर कब्रस्तानासाठी आरक्षण प्रस्तावित केले. महानगरपालिकेच्या विनंतीनुसार सदर क्षेत्रावर विकास योजना मंजूरीतून वगळून सारभूत स्वरुपाचे बदल (ईपी-एमई-८१) नुसार कब्रस्तान हे आरक्षण प्रस्तावित असून सदर ई.पी. ला अंतिम मंजूरी देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाच्या इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(३३) १६६६ (०६-०२-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड. हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ कामगार रुग्णालयांपैकी बहुतेक रुग्णालयाच्या इमारती धोकादायक बनल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालयामध्ये डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांअभावी उपचारासाठी येणाऱ्या कामगार रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांसाठी रुपये १०० कोटींचा निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील कामगार रुग्णालयाच्या इमारतींची दुरुस्ती तसेच तेथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली मार्फत २२ अंशकालीन विशेषज्ञांची नियुक्ती करण्यात आली असून शासनामार्फत १०७ बंधपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या ११ राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांपैकी ८ रुग्णालयाची इमारत राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मालकीची आहे. राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, उल्हासनगर रुग्णालयाचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यात आले असून

सदर रुग्णालयाची इमारत पाडून नवीन इमारत बांधण्याबाबत कार्यवाही विचाराधीन आहे. राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, ठाणे येथील ११ निवासी इमारती पाडण्यात आल्या असून ८ निवासी इमारतींच्या दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, सदर रुग्णालयातील देखभाल व दुरुस्तीची कामे प्राधान्याने करण्यात येत आहे. वरळी, मुलुंड व नागपूर येथील रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यात आले असून सदर रुग्णालयाचे विशेष दुरुस्ती करण्याची बाब विचाराधीन आहे. तसेच, रिक्त पदांबाबत विशेषज्ञ, समवैद्यकीय यांची पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडुप (मुंबई) येथील सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३४) १६६७ (०६-०२-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (मुंबई) येथील ३६० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालयाचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयाचे काम त्वरीत पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२०) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस मौजे नाहूर येथे औद्योगिक क्षेत्रात वसलेल्या भूखंडावर निवासी वापर अनुज्ञेय करतांना विकासकाकडून १८,७६५.३० चौ.मी. चा "सुविधा भूखंड" प्राप्त झाला होता.

सदर भूखंडावर मल्टिस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने दिनांक २७/०७/२०१३ रोजी आदेश दिले होते.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कामासाठी दिनांक ०८/१०/२०१३ व दिनांक १०/१०/२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुक सल्लागारांकडून "स्वारस्याची अभिरुची" मागविण्यात आली होती. परंतु एकही सल्लागार पात्र झाला नाही.

तद्नंतर दिनांक १०/०७/२०१४ रोजी दिलेल्या जाहिरातीमधील पात्र सल्लागारांपैकी लघुतम देकार असलेल्या सल्लागाराची नियुक्ती करुन दिनांक १६/१०/२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

दरम्यानच्या काळात विकासक यांनी सदर जमिनीवरील रस्त्याचे क्षेत्रफळ सुविधा भूखंडामध्ये समायोजित करण्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक १८८५/२०१४ दाखल केली.

सदर याचिकेमधील मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सुविधा भूखंडामधून ८२०९.३० चौ.मी. चा भूखंड विकासकास परत करण्यात आला.

तद्नंतर, विकासकाने विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील समायोजन तरतुदीनुसार समायोजन आरक्षणांतर्गत ८२०९.३० चौ.मी. चा भूखंडाचा विकास करण्यास परवानगी मागितली. सदर परवानगी देताना महानगरपालिकेस दिनांक २०/०३/२०१९ रोजी ४०% भूखंड प्राप्त झाला आहे.

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रुग्णालयाकरिता १६,३६८ चौ.मी. इतका भूखंड उपलब्ध असून, सदर भूखंडावर आवश्यकतेनुसार नियोजित ३६० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्याकरिता सल्लागाराकडून महानगरपालिकेस माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये आराखडे प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार सदर आराखड्यास प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु आहे. तसेच सल्लागारामार्फत मसुदा निविदा बनविण्याचे काम सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

# राज्यातील विविध जिल्हयात फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे नागरिकांमध्ये दंत आणि अस्थिविकारांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(३५) १६८३ (१५-०२-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चंद्रपूर, नांदेड, बुलढाणा, बीड, नागपूर, गडचिरोली, परभणी, जळगाव, वर्धा आणि नाशिक या दहा जिल्हयांतील वाडया-वस्त्यांवरील नागरीकांना "फ्लोराईड" मुक्त पाणी मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये दंत आणि अस्थिविकारांचे प्रमाण वाढल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे राष्ट्रीय आरोग्य अहवालावरुन (नॅशनल हेल्थ प्रोफाईल २०१९) सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दहा जिल्हयात "फ्लोराईड" मुक्त पाणी उपलब्ध करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतचा आढावा घेण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०४-०३-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील चंद्रपूर, नांदेड, बुलढाणा, बीड, नागपूर, गडचिरोली, परभणी, जळगांव, वर्धा आणि नाशिक या दहा जिल्हयांतील रासायनिक तपासणींतर्गत फ्लोराईडकरिता २५६५ नमुने प्राप्त झाले असून त्यापैकी ७ नमुन्यामध्ये १.५ पीपीएम पेक्षा जास्त आढळून आले आहे. सन २०१९ च्या राष्ट्रीय आरोग्य अहवालानुसार (नॅशनल हेल्थ प्रोफाईल-२०१९) ची राज्याची स्थिती खालीलप्रमाणे :-

| State | Community | | | School | |
|---|---|---|---|---|---|
| Maharashtra | Total Number of Examined | Suspected Dental Cases | Suspected Skeletal Cases | Total No of Examined | Suspected Dental Cases |
| | 84218 | 5512 | 1334 | 393783 | 4450 |

(२) पिण्याच्या पाण्यामध्ये फ्लोराईडचे प्रमाण हे १.५ पीपीएम पेक्षा जास्त आढळल्यास फ्लोरोसीस या आजाराचा प्रादुर्भाव होतो. तसेच फ्लोराईडचे प्रमाण कमी करावयाचे असल्यास पावसाच्या पाण्याव्दारे पिण्याच्या पाण्याचे विरलीकरण करणे आवश्यक असल्याने विरलीकरण करण्यासाठी जलयुक्त शिवार, जलसंधारण योजना इत्यादी उपाययोजनातून पावसाचे पाणी विविध माध्यमातून आडविण्यात येते व ते पाणी जवळील आड, विहिर, विंधनविहिर, हातपंप इ स्त्रोतांमध्ये झिरपून फ्लोराईडचे प्रमाण १.० पीपीएम पेक्षा कमी होवून जास्तीत जास्त स्त्रोंताचे पाणी पिण्यास योग्य करण्यात येते.

फ्लोराईडचे प्रमाण अधिक आढळलेले पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बंद करण्याबाबत फलक लावून संबंधित ग्रामपंचायतींकडून सूचना देण्यात येऊन पर्यायी स्त्रोतांव्दारे शुध्द पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच राज्यात पिण्याचे पाण्यातील फ्लोराईडचे प्रमाण योग्य ठेवण्याकरिता D.F.U (जलशुध्दीकरण यंत्रणा) कार्यान्वित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | डि.एफ.यु |
|---|---|---|
| १ | नाशिक | ४ |
| २ | नांदेड | २० |
| ३ | परभणी | ४ |
| ४ | चंद्रपूर | ३८ |
| ५ | गडचिरोली | ८ |
| ६ | नागपूर | ११ |
| ७ | बुलढाणा | ७६ |
| ८ | जळगांव | ८ |

तसेच राष्ट्रीय फ्लोरोसीस नियंत्रण व प्रतिबंधक कार्यक्रमांतर्गत जनजागृती करून विविध उपाययोजना राबविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देण्याबाबत

**(३६) १७१४ (१८-०२-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालयास मंजूरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२४-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत नियुक्त तज्ञ समितीव्दारे पालघर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापनेच्या अनुषंगाने तपासणी करुन प्राथमिक अहवाल सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या प्रस्तावाबाबत

**(३७) १७१५ (१८-०२-२०२०). श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी १०० खाटांचा प्रस्ताव सामान्य (सिव्हिल) रुग्णालय, पालघर यांनी शासनाकडे सादर करुनही प्रस्तावास मंजूरी मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तावास मंजूरी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२६-०२-२०२०) :** (१), (२) व (३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावरुन सुरु असून येथे वाडा येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यामध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थींना कार्डचे वाटप करण्याबाबत

**(३८) १८२८ (०६-०२-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात ४ लाख ३४ हजार १२२ नागरिकांची निवड आयुष्यमान योजनेंतर्गत करण्यात आली असून त्यांना दरवर्षी ५ लाख रूपयापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचे काम रायगड जिल्ह्यात संथगतीने सुरू असल्याने केवळ १ लाख ५३ हजार ४७६ जणांना या योजनेचे कार्ड वाटप करण्यात आले असून अद्यापपर्यंत २ लाख ८० हजार ६४६ लाभार्थ्यांना कार्डचे वाटप करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेची नोंदणी करून कार्ड देण्यासाठी ३० रूपये फी आकारण्याच्या सूचना असताना केंद्र चालक लाभार्थींकडून १०० रूपये फी आकारण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना कार्ड मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२०-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) रायगड जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १,४१,१०९ लाभार्थी कुटुंबे असून सर्वसाधारणपणे ६,६३,२१२ लाभार्थी आहेत. यापैकी १,८३,८९० लाभार्थ्यांना ई-कार्ड वाटप करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात ९ अंगीकृत रुग्णालयातून तर १७६ आपले सरकार सेवा केंद्रातून ई-कार्ड वितरणाचे काम चालू आहे. ई-कार्ड वाटपाचे काम लोकप्रतिनिधींच्या सहभागातून मोहिमेच्या स्वरूपात चालू आहे.

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र शासनाची आरोग्य विमा योजना आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबांना प्रती कुटुंब प्रती वर्ष रू.५ लक्षापर्यंतचे मोफत उपचार अंगीकृत रुग्णालयातून प्राप्त होत आहेत.

(४) हे खरे नाही.

अंगीकृत रुग्णालयांकडून ई-कार्डचे वाटप मोफत केले जाते तर आपले सरकार सेवा केंद्रामधून ई-कार्डसाठी रू. ३०/- इतके शुल्क आकारले जाते.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील उपनगरी रुग्णालये, छोटे दवाखाने सक्षम करुन आवश्यक वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत

**(३९) २००५ (०७-०२-२०२०). ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४४५९१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईची लोकसंख्या वेगाने वाढत असल्याने साथीचे आजार, संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांचे प्रश्न गंभीर झाले असून राज्यातून येणाऱ्या रुग्णांचा भार महापालिकेच्या मुख्य रुग्णालयावर मोठ्या प्रमाणात पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील उपनगरी रुग्णालये, छोटे दवाखाने यांचे वैद्यकिय सेवा सक्षम नसल्याने मोठया रुग्णांलयावर रुग्णांचा भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाचा शासनाने आढावा घेऊन उपनगरी रुग्णालये, छोटे दवाखाने यांच्या सक्षमीकरणावर भर देऊन वैद्यकिय सेवा सक्षम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०२-२०२०) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये मुंबईतील तसेच राज्याच्या विविध भागातून साथीचे आजार, संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांचे रुग्ण मोठया प्रमाणात येतात ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरातील रुग्णालये व छोट्या दवाखान्यांमध्ये येणाऱ्या सर्व रुग्णांना उत्तम दर्जाची सेवा दिली जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. परंतु, काही गंभीर रुग्णांना अतिविशेष उपचारांची गरज भासल्यास मुख्य रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उपनगरातील रुग्णालये व दवाखान्यांमध्ये रक्त तपासणीकरीता “आपली चिकित्सा” सेवा सुरु करण्यात आली असून, त्या अंतर्गत १०१ मुलभूत चाचण्या व ३८ प्रगत चाचण्या नाममात्र शुल्कामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तसेच महानगरपालिकेच्या १५ दवाखान्यांमध्ये सायंकाळी ४.०० ते रात्री ११.०० या कालावधीत वैद्यकीय सेवा सुरु करण्यात आली आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी रुग्णालयांचे विस्तारीकरण तसेच दर्जोन्नतीसह पुनर्विकास प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## बीड जिल्हयातील जिल्हा शल्य चिकित्सक व सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याविरुध्द तक्रारी केल्याबाबत

**(४०) २०२६ (२६-०२-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील जिल्हा शल्य चिकित्सक व सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक यांचेविरुध्द १२ वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य उपसंचालकांकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारींमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक व सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून रुग्णालयात काम करणाऱ्या इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्रास देणे, त्यांच्या ओळखीच्या अधिकाऱ्यांकडे चुकीच्या पध्दतीने पदभार देणे, प्रतिनियुक्त्या, अतिरिक्त पदभार, कामाचे तास निश्चित असतानाही काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वाढीव काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा शल्य चिकित्सक व सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२८-०२-२०२०) :** (१) होय.

(२), (३) व (४) या प्रकरणी सहायक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), लातूर यांनी चौकशी केली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या जास्त असणाऱ्या विभागातील कनिष्ठतम वैद्यकीय अधिकाऱ्यांना डी.एम.ओ. व पी.एम.ड्युटी देण्याचे आणि कामाचा जास्त भार असणाऱ्या विभागातील वैद्यकीय अधिकारी शक्यतो त्याच विभागात ठेवण्याचे निष्कर्ष सदर चौकशीअंती दिलेले आहेत. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांनीही या प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक व तक्रारदार यांची संयुक्त बैठक घेतली असून सदर प्रकरणात करण्यात आलेली तक्रार केवळ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ड्युटीसंदर्भाने असल्याचे बैठकीमध्ये स्पष्ट झालेले आहे. २०० पेक्षा जास्त खाटा असणाऱ्या रुग्णालयातील डी.एम.ओ. व शवविच्छेदनाची कामे ८ वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यासह सी.एम.ओ. व शवविच्छेदन ड्युटीबाबतचा प्रश्न सामंजस्याने सोडविण्याच्या सूचना उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर यांनी दिल्या आहेत. तसेच उपसंचालक कार्यालयाकडून याबाबतीत संबंधितांना सक्त ताकीदही देण्यात आलेली आहे.

---

## आंबेसावळी (ता.जि.बीड) गावामध्ये पशुसंवर्धन योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) २०३३ (२६-०२-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत पात्र व निवडक शेतकऱ्यांना एक कुटुंबामध्ये एका व्यक्तीस शेळी गट, कक्कुट गट व दुधाळ गट या तीन गटापैकी एका योजनेमध्ये एका व्यक्तीला ही योजना देण्यात येत असून यापूर्वी एखाद्या योजनेमध्ये लाभ घेतल्यास त्या व्यक्तीस परत योजनेचा लाभ घेता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुसंवर्धन विभागामधील अधिकारी व कर्मचारी यांची आर्थिक संगनमत करुन आंबेसावळी (ता.जि.बीड) या गावामधील एकाच व्यक्तीच्या नावे वेगवेगळ्या गटामधून पुन्हा लाभ मिळवून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी व दोषी लाभार्थ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०४-०३-२०२०) :** (१) राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांमध्ये एका वर्षात एका कुटुंबास शेळीगट, कुक्कुट गट व दुधाळ गट या तीन गटांपैकी फक्त एका योजनेचा लाभ देण्यात येतो. योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार अर्जदार व त्याच्या कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याला पशुधन वाटपाच्या योजनांमधील कोणत्याही योजनेचा लाभ मागील तीन वर्षात दिलेला असेल तर अशा अर्जदारास योजनेचा लाभ देता येत नाही. तीन वर्षानंतर ते कुटुंब लाभ घेण्यास पुन्हा पात्र ठरते. एका वेळेस एका कुटुंबातील दोन सदस्यांना योजनेचा लाभ देण्यात येत नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याच्या सूचना आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पोषण आहार करणाऱ्या महिला बचत गटांचे दर वाढविण्याबाबत

**(४२) २१०१ (०२-०३-२०२०). श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोषण आहार करणाऱ्या महिला बचत गटांना एक किलो खिचडी तयार करण्याकरिता रुपये १० दिले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची वाढती महागाई पाहता सदरचे दर वाढविण्याबाबत शासनाने काही निर्णय घेतले आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे व याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात पोषण आहार करणाऱ्या महिला बचत गटांना खाद्यपदार्थांचे दर वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०६-०३-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेंतर्गत पूरक पोषण आहार वितरीत करण्यात येतो. या योजनेकरीता केंद्र शासनाकडून पोषण आहाराचे दर निश्चित करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोना विषाणूचे रुग्ण आढळून आल्याबाबत

**(४३) २११२ (०६-०२-२०२०). श्री.रविंद्र फाटक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना विषाणूचे १० संशयीत रुग्ण व मुंबईमध्ये ३ रुग्ण आढळून आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईमधील तीनही रुग्ण वसई-विरार (जि.पालघर) या भागातील आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात पाच, पुण्यातील नायडू रुग्णालयात दोन आणि नांदेड शासकीय रुग्णालयात एक कोरोना विषाणूची लागण झालेल्या रुग्णांवर उपचार सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरोना व्हायरस राज्यात अन्यत्र पसरु नये म्हणून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच रुग्णांवर उपचार करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०२-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

जानेवारी, २०२० मध्ये राज्यात करोना आजाराचे संशयित असे १५ प्रवाशी निरीक्षणाखाली भरती करण्यात आले होते. यातील ८ जणांना कस्तुरबा रुग्णालयात तर ५ जणांना नायडू रुग्णालय, पुणे येथे भरती करण्यात आले होते. तर १ जण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड व १ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे भरती होते. हे सर्व प्रवासी प्रयोगशाळा तपासणी अंती करोनासाठी निगेटिव्ह आढळले. सदर रुग्णांना घरी सोडण्यात आले असून त्यांची प्रकृती व्यवस्थीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून केंद्र शासनाने दिलेल्या सूचनानुसार आरोग्य सेवा संचालनालयाने दि.२२/०१/२०२० च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

- आंतरराष्ट्रीय विमानतळावर बाधित भागातील प्रवाशांची तपासणी केंद्र शासनामार्फत करण्यात येते.
- इन्फूल्यूएंझा सदृश्य रुग्ण आणि श्वसन संस्थेच्या तीव्र प्रादुर्भाव या आजाराचे सर्वेक्षण सर्व आरोग्य संस्थानी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.
- एनआयव्ही पुणे यांना रुग्ण निदानासाठी नमुने पाठवितांना ते जिल्हा शल्य चिकित्सकांमार्फत राज्य आय.डी.एस.पी. विभागाच्या अनुमतीने पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
- रुग्णालय स्तरावर संसर्ग प्रतिबंध यंत्रणा कार्यरत करण्याबाबत सर्व शासकीय आरोग्य संस्थांना निर्देशित करण्यात आले आहे.

- कोरोना रोग प्रसार कसा होता व त्यावर प्रतिबंधात्मक उपाय याबाबतचे जनतेस आरोग्य शिक्षण व प्रबोधन करण्यात येते.
- एन.आय.व्ही. पुणेसह कस्तुरबा रुग्णालय, मुंबई व आय.जी.एम.सी. नागपूर येथे कोरोना निदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.
- राज्यात बहुतांश रुग्णालयांमध्ये विलगीकरण कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.
- राज्य नियंत्रण कक्षाची व समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## पंढरपूर परिसरातील अस्वच्छतेमुळे यात्रेकरु व नागरिकांना साथीच्या रोगांची लागण झाल्याबाबत

**(४४) २१६८ (०६-०२-२०२०). श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा. जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे तुंबलेले गटार, केरकचरा, पाणी साठून राहिलेले खड्डे, अस्वच्छ परिसरामुळे यात्रेकरु व नागरिकांना डेंग्यू, मलेरिया व गॅस्ट्रो इत्यादी साथींचे आजार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंढरपूर परिसरातील साथीच्या आजारांना नियंत्रणात आणण्यासाठी तसेच रुग्णांवर उपचार करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथे माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१९ मध्ये एकूण ७५ संशयीत ताप रुग्ण आढळून आलेले असून त्यापैकी ६ रुग्ण डेंग्यूचे आढळून आलेले आहेत. सदर कालावधीत हिवतापासाठी २४,५५६ रक्त नमुने

तपासणी अंती मलेरियाचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही. तसेच गॅस्ट्रोचे १६ रुग्ण आढळून आले आहेत.

(२) साथरोग/किटकजन्य आजारावर नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविण्यात येत आहेत :-

- नियमित साथरोग सर्वेक्षण.
- रुग्णोपचारासाठी पुरेसा औषधसाठा.
- निदानासाठी प्रयोग शालेय सुविधा.
- किटकजन्य आजारांसाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन.
- डासोत्पत्ती रोखण्यासाठी लोकसहभाग, धुरफवारणी, गप्पी मासे सोडणे, टॅमीफॉसचा वापर या प्रतिबंधक उपाययोजनेसह आठवड्यातून एक दिव कोरडा दिवस पाळण्यात येतो.
- पंढरपूरमध्ये ८९,८२२ घरांची तपासणी करुन ६२,२४४ घरांमध्ये धुरफवारणी केली आहे.
- नियमित पाणी शुध्दीकरण व शुध्द पाणीपुरवठा याबाबत प्रबोधन
- पाणी गळती रोखण्यासाठी प्रबोधन.
- आंतरविभागीय समन्वय.
- विविध साथरोग प्रतिबंधासाठी जनप्रबोधन.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तरडगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील सीना नदीवरील बंधाऱ्यातून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(४५) २१७१ (०६-०२-२०२०). श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तरडगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील सीना नदीवर अधिकारी व ठेकेदाराच्या दुर्लक्षतेमुळे कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातून मोठया प्रमाणावर गळती सुरु असल्याने या बंधाऱ्यातील पाणी कमी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गळतीमुळे बंधाऱ्यात पाणी शिल्लक राहत नसून शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या बंधा-यातील पाणी गळतीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करुन बंधा-यातील पाणी गळती थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२५-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

को.प.बंधाऱ्यावर टाकलेल्या बर्गेमधून पाणी गळती होत नाही.

सदर बंधाऱ्याच्या साईडच्या दोन्ही बाजूस असलेल्या संरक्षक दगडी भिंतीमधून अल्प प्रमाणात पाझर सुरु आहे. त्यामुळे बंधाऱ्यातील पाणी कमी होत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर बंधाऱ्याचे संरक्षक दगडी भिंती मधुन पाणी गळतीचे प्रमाण अल्प प्रमाणात असल्याकारणाने बंधाऱ्यामधील साठविलेल्या पाण्याचा उपयोग बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रामधील शेतकऱ्यांना होत आहे. तसेच त्यामुळे शेती पिकांचे नुकसान होत नाही.

(३) सदर बंधाऱ्याच्या तिरावरील संरक्षक भिंतीमधुन होणाऱ्या अल्प प्रमाणातील पाणी गळती थांबवण्यासाठी संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीचे (प्लॅस्टर वर्क) व बंधाऱ्याचे वरील बाजूस कॉँक्रीट भिंतीचे बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर बाबतीत कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लाखीवली समूह ग्रामपंचायतीमध्ये सरपंच व ग्रामसेवकाने अनुदानात गैरव्यवहार केल्याबाबत

**(४६) २१७६ (०६-०२-२०२०). श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखीवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) समूह ग्रामपंचायतीमध्ये नांदा कातकरी पाडा, पारिवली, धामणे या गावांसह १६ आदिवासी पाडयांचा समावेश असून नांदा कातकरी पाडयातील आदिवासींना शासनाने शौचालय बांधण्यासाठी प्रत्येकी रु.१२,०००/- याप्रमाणे अनुदान दिलेले असून तेथील सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमत करुन आदिवासींना दिवाळीची भेट दिली असे सांगून त्यांना बँकेत नेले आणि त्यांच्या खात्यातून पैसे काढून घेतल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराला जबाबदार असलेल्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा तेथील ग्रामस्थांनी निवेदनाव्दारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या गैरव्यवहाराला जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२४-०२-२०२०) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी यांचे दि. ७/२/२०२० च्या पत्रान्वये संबंधित सरपंच श्री. केशव भगली यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३९(१) नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच ग्रामविकास अधिकारी श्री. बी.बी. जाधव यांचेविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६(२) नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकाकडे जातांना साबळेनगर येथे महिलेवर अत्याचार झाल्याबाबत

**(४७) २२२७ (१५-०२-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला-टिळकनगर रेल्वे स्थानकापासून लोकमान्य टिळक टर्मिनस स्थानकाकडे जातांना साबळेनगर येथे ३१ वर्षीय विवाहितेवर चौघांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेहरुनगर (कुर्ला) पोलिसांनी चारही दोषी आरोपींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (०३-०३-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून नेहरूनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. २३/२०२० कलम-३७६ (ड), ३७७, ३५४, ३५४ (अ), ३९४, ५०६, ३४ भादंवि प्रमाणे एकूण चार आरोपींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील चारही आरोपीतांना अटक करण्यात आली असून सध्या आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर येथील कुपोषित बालकांसाठी खरेदी करण्यात आलेल्या प्रोटीन पावडरमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४८) २३२२ (०६-०२-२०२०). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर येथील कुपोषित बालकांसाठी सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या कालावधीत बालकांच्या नावाने प्रोटीन पावडर खरेदी करून आर्थिक गैरव्यवहार झाल्याची तक्रार राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र आढावा समितीच्या लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, जिल्हाधिकारी, पालघर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२४-०२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणात दिलेल्या अहवालानुसार गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.

---

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासींच्या प्रलंबित मागण्याबाबत

**(४९) २५५३ (१४-०२-२०२०). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी समाजास गावनिहाय वनहक्क द्यावा, जंगलाला कुंपण घालावे, निराधार पेन्शन योजना, पेसा कायदयाची अंमलबजावणी तसेच १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका पूर्ववत सुरु करणे व

तिरपाड येथे नवीन रुग्णवाहिका मंजूर करणे इत्यादी अन्य मागण्यासंदर्भात अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने चारशेहून अधिक महिला व नागरिकांनी दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागण्याबाबतची सविस्तर निवेदने त्याचदिवशी तहसिलदार, घोडेगाव, अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग तसेच मा.आदिवासी विकास मंत्री यांनाही देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने आदिवासी समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२८-०२-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) प्रस्तुत निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, जि.पुणे यांनी दि.१३/०१/२०२० च्या पत्रान्वये आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील एकूण ७० दावे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय वनहक्क समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे उचित निर्णय घेण्यासाठी पाठविले आहेत.

तसेच जंगलाला कुंपन घालण्यासंदर्भात उपवनसंरक्षक, जुन्नर यांना दि.०२/०१/२०२० च्या पत्रान्वये विचारणा केली आहे. पंचायत समिती, आंबेगाव यांनी २४ गावांचे पेसा गाव घोषित करण्यासंदर्भातील प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, मंचर कार्यालयास पाठविले आहेत. तहसिलदार, आंबेगाव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/०१/२०२० रोजी संघटनेसोबत बैठक घेण्यात येऊन संघटनेच्या निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी व हिंगोली जिल्हयातील ग्रामीण रस्त्यांकरिता कमी निधी मिळाल्याबाबत

**(५०) ४४५७९ (०५-१२-२०१८). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी व हिंगोली जिल्हयातील ग्रामीण भागात रस्त्यांचे मोठ्या प्रमाणात जाळे पसरलेले असून मागील चार वर्षामध्ये ग्रामीण रस्त्यांकरिता अत्यंत कमी निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून ग्रामीण विभागातील रस्त्यांकरिता अत्यंत कमी प्रमाणात निधीचे नियोजन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी व हिंगोली जिल्हयामधील रस्त्यांकरिता अत्यंत कमी निधी देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर रस्त्यांकरिता भरीव निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-०३-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) जिल्हयाची सामाजिक, आर्थिक व भौगोलिक गरज लक्षात घेऊन संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने केलेल्या मागणीचा साकल्याने विचार करुन शासनाने जिल्हा वार्षिक योजनेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या मर्यादेत विविध योजनांना जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो.

रस्ते बांधकामासाठी सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या कालावधीत हिंगोली जिल्हयास रु.९१८०.८९ लक्ष तर परभणी जिल्हयास रु.१२२६८.०८ लक्ष निधी जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे ३०५४ २४१९ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेस रु.२४९७.८२ लक्ष व परभणी जिल्हा परिषदेस रु.२२५०.७८ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ ते २०१८-२०१९ मध्ये हिंगोली जिल्हयास रु.१४२१३.०० लक्ष व परभणी जिल्हयास रु.१४३१९.७७ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१५-२०१६ ते २०१७-२०१८ मध्ये हिंगोली जिल्हयास रु.२३४४.२३ लक्ष व परभणी जिल्हयास रु.४१९२.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आले आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.